# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दुरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune.dte@gmail.com; Website www.ropune.org.in

**कालमर्यादा – दि. ०५/०९/२०१९**
**परिपत्रक**

जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/ 3608
दिनांक : 30 AUG 2019

**विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत गट क व गट ड पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती ---**

संदर्भ :- १. शासन निर्णय,वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्रं.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/२८४६दि.०९/०७/२०१९

सर्व संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार तसेच संदर्भ क्रं.०२ अन्वये आपल्या संस्थेतील / कार्यालयातील गट-क व गट-ड संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१९ पर्यतच्या कालावधीत) यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे. त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय असणारी तीन लाभांची सुधारीत सेवातंर्गत आश्वासित योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ नंतर दिनांक ३१/०३/२०२० पर्यतच्या कालावधीत सेवेची १०-२०-३० वर्षे पुर्ण होत आहेत. अशा गट क व गट ड कर्मचाऱ्यांची माहिती मागवण्यात आलेली होती.

संस्थास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी केली असता त्यात बऱ्याच त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या पत्रासोबत जोडलेल्या सुधारित नमुन्यात संस्थांनी पात्र कर्मचा-यांची माहिती **दिनांक ५ सप्टेंबर २०१९** पर्यंत तात्काळ सादर करावी. सदरची माहिती **Excell Sheet DV-TTYogesh** या फॉन्टमध्ये **A3** साईज पेपरवर तयार करावी, तसेच ई-मेल द्वारे **est.ropune@gmail.com** या पत्त्यावर सॉफ्टकॉपी पाठवावी.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची बैठक सप्टेंबर महिन्यात प्रस्तावित असल्याने सदरची माहिती सादर करतांना खालील बाबींची तपासणी करण्यात येवून अचूक माहिती सादर करावी.

१. सेवेतील प्रथम नियुक्तीचा दिनांक, पदनाम, जन्म दिनांक
२. असाधारण रजा (विनावेतन) असल्यास त्या त्या कालावधीचा तपशील
३. कर्मचा-यास सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती/ प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यांची गणना करुन माहिती सादर करावी.
४. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मत्ता व दायित्वे सादर केल्याची नोंद घ्यावी.
५. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी सादर करण्यात यावी.
६. सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नोंदींच्या अनुषंगाने संगणक अर्हता, मराठी/हिंदी भाषा सूट, विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट (लिपीकवर्गीय कर्मचा-यांसाठी), जातवैधता प्रमाणपत्र नोंद, पहिला लाभ/दुसरा लाभ मिळाल्यांच्या नोंदी, चारित्र्य पडताळणी नोंद इत्यादी ठिकाणी फ्लॅग लावण्यात यावेत.
७. या विभागीय कार्यालयातील कर्मचा-यांची माहिती सुलभ संदर्भासाठी देण्यात येत असून त्याप्रमाणे अचूक माहिती सादर करावी.

**सोबत विवरणपत्र**

३०।८।१९
प्र.सहसंचालक, करिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी –**
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये,
पुणे विभाग

Scanned by CamScanner